कार्यालयीन प्रत मिळाली
[signature]



**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** येवला तालुका

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Year (वर्ष):** 2025

   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/01/2025 23:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 , 7 अ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 08/01/2025

      **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2025

      **Time From (वेळेपासून):** 12:23 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 12:46 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 08/01/2025 **Time (वेळ):** 23:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

   **Entry No. (नोंद क्र.):** 040

   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/01/2025 23:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 9 किमी **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** नगरसुल,येवला

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अनिल नाना येवले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुसमाडी ता येवला,येवला तालुका,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुसमाडी ता येवला,येवला तालुका,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7066423876

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे श्री.बापु वामनराव पवार | | | 1. सुतारनेट , शिरूर कासार, शिरूर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद येवला जि.नाशिक
दि. 08/01/2025

माझे नाव अनिल नाना येवले वय 49 वर्षे धंदा- शेती रा. कुसमाडी ता. येवला जि. नाशिक मोबा. 7066423876, 9158281334

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी एकत्रित कुटुंबिय राहतो व माझी वडिलोपार्जित शेती करुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नांवर मी माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.
माझी वडिलोपार्जीत मौजे कुसमाडी येथे गट नं.400 खाते न. 22 मधील क्षेत्र 1.76 आर शेती आहे. त्यापैकी 40 आर क्षेत्र मुलगा गौरव अनिल येवले व 40 आर क्षेत्र पत्नी मनिषा अनिल येवले यांचे नावावर दिनांक 13/09/2024 रोजी दुयम निबंधक येवला यांचेकडे वाटपपत्राचे दस्त क्रमांक 4687/2024 अन्वये दस्त नोंद केलेला आहे. सदर वाटप पत्राची झेरॉक्स प्रत माझे खाते न. 22 मध्ये मुलगा गौरव व पत्नी मनिषा यांचे 7/12 उतारा नावे लावण्यासाठी तलाठी बापु वामनराव पवार सजा कुसमाडी यांचेकडे कागदपत्र दिले होते. त्याची पोहच प्रत मी ऑनलाईन काढलेली आहे. मी वेळोवेळी 7/12 उता-यावर मुलगा व पत्नी यांचे नावे लागलेली नसल्याने तलाठी बापु पवार यांना विचारणा केली. तेव्हा त्यांनी मला कळविले की नोंद क्रमांक 2057 मध्ये मुलगा गौरव याचे नावामध्ये नोंद करतानी नावामध्ये ( गाौरव ) असे दिसून येते. त्यामुळे मंडळ अधिकारी नगरसुल यांनी ती नोंद रद्द केली असून त्यामुळे नोंद दुरूस्त करण्यासाठी व 7/12 उता-यावर गौरव येवले व मनिषा येवले यांची नावाची नोंद करण्यासाठी मला दोन हजार रूपये दयावे लागतील नाहीतर मी नोंद दुरूस्त करणार नाही असे म्हटले होते. दिनांक 07/01/2025 रोजी त्यांनी नगरसुल तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय येथे मला पैशाची बोलणी करण्यासाठी बोलाविले आहे. तरी मला श्री. बापु पवार यांना पैसे देण्याची मुळीच इच्छा नसुन त्यांचेत व माझेत कोणताही आर्थिक उधार उसनवारीचा व्यवहार नसुन पुर्ववैमनस्य नाही. तरी त्यांचेवर आपलेकडून कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे. सोबत वाटपपत्र व नोंद रदद केल्याची छायांकित प्रत जोडली आहे. अशा आशयाची तक्रार लिहुन दिली.
सदर तक्रारीचे अनुषंगाने श्रीमती स्वाती पवार, पोलीस उप अधीक्षक मॅडमांनी दिनांक 07/01/2025 रोजी माझे तक्रारीप्रमाणे कुसमाडी सजेचा अतिरीक्त चार्ज नगरसुल येथील तलाठी श्री. बापु पवार यांचेकडे असल्याने ते माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व पवार मॅडमांनी सोबत आणलेले पंच श्री.डोईफोडे अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन मी उपलब्ध केलेल्या दुचाकी एम.एच.43 एम 4497 हिचेवर साधारण 14/18 वाजेचे सुमारास नगरसुल नांदगाव रस्त्याचे कडेला असलेल्या हॉटेल गारवाचे पुढे असलेल्या मोकळया जागी नगरसुल येथून रवाना केले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्री. डोईफोडे असे नगरसुल येथील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयात जावुन श्री. बापु पवार तलाठी यांची भेट घेतली असता त्यांनी 2057 नोंद मंडळ अधिकारी नगरसुल यांचेकडे 7/12 उताऱ्यावर नोंद होण्यासाठी ऑनलाईन पाठविली होती. व मंडळ अधिकारी, नगरसुल यांनी सदरची 2057 नोंद गौरव यांचे नाव दाखल करताना चुकले आहे दुरूस्त करून फेर सादर करण्यासाठी नोंद नामंजूर केली होती. त्यामुळे तलाठी बापु पवार यांनी मुलगा गौरव अनिल येवले व पत्नी मनिषा अनिल येवले यांचे नाव 7/12 उताऱ्यावर नवीन नोंद घेण्यासाठी माझेकडे 1000/-रू त्यांचेसाठी व 500/-रू मंडळ अधिकारी यांना देण्यासाठी असे एकुण 1500/-रुपये लाचेची मागणी करून 1000/-रू रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते. त्यानंतर लोकसेवक श्री. बापु पवार हे कार्यालयातुन निघुन जाणार असल्याने दिनांक 08/01/2025 रोजी यशस्वी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.
त्याप्रमाणे दिनांक 08/01/2025 रोजी लोकसेवक श्री. बापु पवार तलाठी यांची भेट घेवून लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी मी जाणार असल्याने श्रीमती स्वाती पवार मॅडम असे दिनांक 08/01/2025 रोजी सापळा पथकासह नगरसुल नांदगाव रस्त्याचे कडेला पाटाजवळ नगरसुल येथे रस्त्याचे बाजुला असलेल्या मोकळया जागी आले.

त्यावेळी माझेकडे श्रीमती स्वाती पवार मॅडम यांनी मी हजर केलेली 1000/-रू लाचेची रक्कम अॅन्थ्रासीन पावडर लावून माझेकडे देवुन तसेच व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते चालु करुन मला व पचं नं. 1 श्री. डोईफोडे यांना तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय नगरसुल येथे 12/23 वाजेचे सुमारास रवाना केले होते. त्यावेळी मी व पंच नं. 1 असे तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय नगरसुल येथे जावुन लोकसेवक श्री. बापु पवार तलाठी यांची भेट घेतली व माझे कामाबाबत चर्चा केली तेव्हा त्यांनी मला कार्यालयाचे बाहेर बोलावून माझेशी लाचेच्या रक्कमेसंदर्भाने चर्चा केली व लोकसेवक श्री.बापु पवार तलाठी मला म्हणाले, आता हे करायच कस? असे म्हणुन त्यांनी उजवा हात पुढे करून लाचेची रक्कम देणेबाबत हाताने इशारा केला, त्यावेळी मी त्यांना म्हणालो पाचशे नोंद घ्यायला आल्यावर देतो हे हजार पोहचले तुम्हाला असे म्हणुन माझे उजवे हाताने माझे शर्टचे डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम बाहेर काढून लोकसेवक श्री. बापु पवार यांचे समोर धरली असता लोकसेवक श्री. बापु पवार यांनी त्यांचे उजवे हाताने लाचेची रक्कम स्विकारून ती त्यांचे नसते पॅन्टचे पाठीमागील उजवे बाजुचे खिशात ठेवली ठेवली. त्यांनतर मी लोकसेवक श्री. बापु पवार तलाठी यांनी लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा सापळा पथक हे कार्यालयाचे बाहेर येवून लोकसेवक श्री. बापु पवार यांना सापळा पथकाने पकडले आहे. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.
दिनांक 07/01/2025 रोजी माझेकडे लोकसेवक श्री. बापु पवार तलाठी यांनी पैशाची मागणी करुन त्यापैकी स्वतासाठी 1000/-रू व मंडळ अधिकारी यांचेसाठी 500/रू असे एकुण 1500/-रू लाचेची मागणी करून दिनांक 08/01/2025 रोजी 12/23 ते 12/46 वाजेचे सुमारास नगरसुल येथील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाचे बाहेर पंच साक्षीदारासमक्ष स्विकारली. यावरुन लोकसेवक श्री.बापु वामनराव पवार वय 53 वर्षे व्यवसाय-तलाठी सजा, नगरसुल अतिरीक्त कार्यभार कुसमाडी ता. येवला जि. नाशिक हल्ली रा. श्री. अशोक शेलार शिक्षक यांचे घरात भाडयाने, विठ्ठल नगर, येवला पैठणी समोर, कोटमगाव रोड येवला जि. नाशिक मुळ रा. सुतारनेट , शिरूर कासार ता. शिरूर कासार जि. बीड यांनी दुयम निबंधक येवला यांचेकडे मुलगा गौरव व पत्नी मनिषा यांचे नावे प्रत्येकी 40 आर क्षेत्र वाटप केल्याचे दस्त नोंद केला होता. सदर दस्ताप्रमाणे त्यांचे नावे 7/12 उता-यावर नोंद करण्यासाठी तलाठी श्री. बापु पवार यांनी 2057 नोंद मंजुर होण्यासाठी मंडळ अधिकारी नगरसुल यांचेकडे पाठविली होती. परंतु मंडळ अधिकारी नगरसुल यांनी गौरव याचे नाव दाखल करताना चुकले आहे दुरूस्त करून फेरसादर करा असे म्हणुन नोंद रद्द केली होती. त्यामुळे गौरव याचे नाव दुरुस्त होवून नवीन नोंद 7/12 उता-यावर करण्यासाठी माझेकडून स्वतःसाठी 1000/-रू व मंडळ अधिकारी नगरसुल यांचेसाठी 500/रू अशी एकुण 1500/-रू लाचेची मागणी करून प्रथम हप्ता म्हणुन 1000/-रू नोंद टाकण्यापुर्वी व नोंद मंजुर झाल्यानंतर 500/-रू अशी पैशांची मागणी करुन प्रथमतः 1000/- रू लाचेची रक्कम माझेकडून स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. परंतु मंडळ अधिकारी श्री. गणेश आत्माराम लाडेकर यांनी माझेकडे प्रत्यक्षात लाचेची मागणी केलेली नाही.
माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.
समक्ष हि फिर्याद दिली

दि. 08/01/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sandip punja mandlik(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
येवला तालुका पो.स्टे.
जिल्हा नाशिक ग्रामीण

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sandip punja mandli
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):